स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
निवडणुकांच्यावेळी वापरावयाच्या
मतदार यादीबाबत.

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१५/प्र.क्र.३ /प्रकल्प कक्ष
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७/०४/२०१५

## आदेश

ज्याअर्थी,भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करणे व या निवडणुकाचे आयोजन करण्याची अधिक्षण, संचालन व नियंत्रण याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १९ (ब) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ७-अ महाराष्ट्र नगरपालिका, नगरपरिषदा व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हापरिषदा आणि पंचायत समिती अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा.५) च्या कलम १३, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १२ अन्वये लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० च्या तरतुदीअन्वये महाराष्ट्र विधानसभेसाठी तयार केलेली आणि राज्य निवडणूक आयुक्त यांनी अधिसूचित केलेल्या दिनांकाची असलेली मतदार यादी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता विभागून व अधिप्रमाणित करुन वापरण्याबाबत तरतूद आहे.

आणि ज्याअर्थी, भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे राज्यामध्ये लोकसभा व विधानसभा निवडणुकांसाठी वापरावयाची मतदार यादी तयार करण्याची सर्व कार्यवाही जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी व त्यांचे अधिनस्त अधिकाऱ्यांकडून करण्यात येते.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी (मुदत संपणाऱ्या) जाहीर केलेला विशिष्ट दिनांक ग्राह्य धरुन विधानसभेसाठी तयार करण्यात आलेली मतदार यादी जशीच्या तशी त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते.

D:\Mahale DS\मतदार यादीबाबत सूचना.docx



श्री. सुळे महत्वाचे आदेश

आणि ज्याअर्थी, मतदार यादीमध्ये दुरुस्ती करण्याबाबतची प्रक्रिया लोकसभा / विधानसभेच्या निवडणुकांपूर्वी ज्या गांभीर्याने केली जाते, त्याच गांभीर्याने ती स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी सुध्दा करण्याची गरज आहे.

आणि ज्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जाहीर केलेला विशिष्ट दिनांक लक्षात घेता भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे जिल्हाधिकारी व त्यांच्या अधिनस्त अधिकारी यांनी तयार केलेली मतदार यादी अद्ययावत करण्यात आली आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ (सन १९६२ चा महा. ५) च्या कलम ९ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने पारित केलेले आदेश लक्षात घेता <u>मतदार यादी बिनचूक, त्रुटीविरहीत तयार करण्यासाठी राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे</u> :-

<u>१) नवीन मतदारांची नोंदणी करणे-</u>

i) सर्व जिल्हाधिकारी यांनी मुदत संपणाऱ्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वर्षनिहाय व महिनानिहाय कॅलेंडर तयार करावे.

ii) ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सार्वत्रिक निवडणुका असतील त्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्राह्य धरण्यात येणारी विशिष्ट दिनांकाच्या कमीत कमी ६ महिने अगोदरपासून त्यांनी **मतदार जागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबवावा.** त्यामध्ये १८ वर्षांच्यावरील सर्व पात्र व्यक्तींची नावे मतदार यादीमध्ये नोंदविली जातील या दृष्टीने जनजागृती करावी. यासाठी जिल्हाधिकारी यांनी आवश्यक त्या सर्व उपाययोजना कराव्यात. प्रसंगी त्याकरीता शासनाच्या निरनिराळे विभाग, स्वयंसेवी संस्था, खाजगी कंपन्या इ. यांची मदत घ्यावी. १८ वर्षावरील एकही पात्र व्यक्ती विशिष्ट दिनांकास नोंदणीशिवाय राहणार नाही याकडे जिल्हाधिकारी यांनी विशेष लक्ष देणे आवश्यक राहील.

iii) राज्य निवडणूक आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारी, सूचना व अर्ज संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यास त्यावर संबंधित जिल्हाधिकारी यांनी वेळेवर भारत निवडणूक आयोगाच्या सूचनांप्रमाणे कार्यवाही करावी.

२) मतदार याद्या त्रुटी / चूका विरहीत होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे -

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या ग्राह्य धरण्यात येणारी विशिष्ट दिनांकास अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी जशीच्या तशी त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी वापरण्यात येते.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रभाग, मतदार विभाग, निर्वाचक गण इत्यादी प्रमाणे या मतदार यादीचे विभाजन करुन प्रारुप यादी प्रसिध्द करण्यात येते व त्यावर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यात येतात.

आलेल्या हरकतींपैकी १) मतदारांची नावे चुकीच्या प्रभागात समाविष्ठ झाली असतील २) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राच्या बाहेर असलेल्या मतदारांची नावे समाविष्ठ झाली असतील किंवा ३) विधानसभा मतदार यादीत नाव असून सुध्दा ते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार यादीत समाविष्ठ करण्याचे राहून गेले आहे, अशा हरकती व सूचनांचा फक्त विचार करुन, अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने या दुरुस्त्या करण्यात येतात.

विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्त्यामधील दुरुस्ती करणे इ. अधिकार राज्य निवडणूक आयोगाला नाहीत.

ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्यावेळी प्रारुप मतदार यादीवर असलेल्या हरकती अंतिम करताना मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी (Booth Level Officer) प्रत्येक मतदाराच्या निवासस्थानी / पत्त्यावर भेट देणे क्रमप्राप्त आहे.

यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी सर्व चुका / त्रुटींसंदर्भात माहिती व्यवस्थित गोळा करावी. उपरोक्त परिच्छेदामध्ये नमूद ३ प्रकारच्या हरकती / सूचनांबाबत स्थानिक स्वराज्य संस्थेची मतदार यादी अधिप्रमाणित

करणाऱ्या अधिकाऱ्याने दुरुस्ती करावी, उर्वरित त्रुटी / चुकांसंदर्भात प्राप्त झालेली माहिती भारत निवडणूक आयोगाच्या मतदार नोंदणी अधिकारी यांचेकडे पाठवावी. मतदार नोंदणी अधिकारी यांनी भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेप्रमाणे त्यांची दखल घेऊन मतदार यादी दुरुस्ती करावी.

३) भारत निवडणूक आयोगाने नुकताच राष्ट्रीय मतदार याद्या शुध्दीकरण व प्रमाणिकरण कार्यक्रम "NERPAP-National Electoral Electoral Rolls Purification and Authentication Programme" हाती घेतला आहे. यात मतदाराचा आधार कार्ड नंबर हा मतदार ओळखपत्राशी (EPIC DATA) लिंक करण्याचे प्रस्तावित आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्यावेळी मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) यांनी मतदाराच्या निवासस्थानाच्या भेटीच्यावेळी मतदार ओळखपत्राशी आधारकार्डाची सांगड घालण्याबाबत सुध्दा आवश्यक ती खबरदारी घ्यावी. या कार्यक्रमाअंतर्गत संबंधित जिल्हाधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे मतदान केंद्र स्तरीय अधिकारी (BLO) उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, मुख्याधिकारी, नगरपालिका व महानगरपालिका आयुक्त यांची असेल.

४) राज्य निवडणूक आयोग जिल्हाधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत नियमितपणे आढावा घेईल.

हे आदेश मुख्य निवडणूक अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहेत.

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

Pradeep Vyas
(प्रदीप व्यास) ७/५/२०१५
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत
प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
जिल्हाधिकारी (सर्व)
महानगरपालिका आयुक्त, (सर्व)
जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती (सर्व)